वागळे वाहतूक उपविभागाचे हददीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.deptraffic@mahapolice.gov.in

जा.क. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ २० /२०२६ दि. १४/०१/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, वागळे वाहतूक उपविभागाचे हददीत ठाणे महानगरपालिका ठाणे च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषगाने लोकमान्य – सावरकरनगर प्रभाग समिती, प्रभाग क्र.६, १३, १४, १५ निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, कोरस रोड, वर्तकनगर ठाणे येथे दिनांक १४/०१/२०२६ रोजी मतपेटया वाटप, दि.१५/०१/२०२६ रोजी मतपेटया जमा तसेच दि. १६/०१/२०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे **अधिसूचना** जारी करीत आहे. –

प्रवेश बंद –	**१)** यशोधन नगर, आईमाता चौक व आजुबाजुच्या परीसरातील सर्व वाहने ही रूणवाल टॉवर, अपोलो फार्मशी मेडीकल कडुन व लोकमान्यनगर, लक्ष्मी पार्क,शास्त्रीनगर चौकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनाना तसेच रामचंद्र ठाकूर तरण तलाव व महिला बचत गट भवन बिल्डींग कडे रोडने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनाना **अपोलो फार्मशी मेडिकल कॉर्नर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	यशोधन नगर, आईमाता चौक व आजुबाजुच्या परीसरातील सर्व वाहने ही कोरस टॉवर कडुन सरळ जावून वर्तकनगर नाक्याकडुन डावीकडे वळून इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**२)** शास्त्रीनगर नाका,लक्ष्मी पार्क व आजुबाजुच्या परीसराकडुन रूणावालपलाझा मार्गे आईमाता चौकाकडे जाणारी सर्व वाहनांना **लक्ष्मी पर्क–१ चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	लक्ष्मी पार्क व शास्त्रीनगर आजुबाजुच्या परीसरातील सर्व वाहने ही शास्त्रीनगर नाक्याकडुन उजवीकडे वळुन पुढे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**३)** कॅडबरी जंक्शन मार्गे वर्तकनगर **नाक्याकडुन** रामचंद्र ठाकूर तरण तलाव व बचत गट बिल्डींग कडे रोडने येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **वर्तकनगर नाका पोलीस चौकी** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सरदची वाहने कोरस टॉवर – आईमाता चौक – यशोधनगर बसस्टॉप कडुन डावीकडे वळून इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**४)** लोकमान्य पाडा न.३ परीसरातील सर्व प्रकारच्या वाहनाना **ओम मेडीकल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	लोकमान्यनगर पाडा न.३ मधील सर्व प्रकारची वाहने ही लाकडी पुलावरून लोकमान्यनगर बस डेपो कडुन डावीकडे –उजवीकडे वळुन इच्छित स्थळी जातील. तसेच स्वामी समर्थ मठ मार्गे यशोधनगर बस स्टॉप वरून डावीकडे उजवीकडे वळुन इच्छित स्थळी जातील.
नो पार्किंग –	**१)**रूणवाला पलझा टॉवर, अपोलो फार्मशी मेडीकल ते लक्ष्मी पार्क १ पर्यत रोडच्या दोन्ही बाजुस येणा–या जाण–या वाहीनीवर **नो पार्किंग** क्षेत्र करण्यात येत आहे.
नो पार्किंग	**२)** ओम मेडीकल – तरणतलाव – लोकमान्यनगर पाडा न.१, मधील हनुमान मदिर पर्यत रोडच्या दोन्ही बाजुस **नो पार्किंग** क्षेत्र करण्यात येत आहे.
नो पार्किंग	**३)** ओम मेडीकल ते कृष्णा दुध डेरी, लोकमान्यनगर पाडा न.३ पर्यत रोडच्या दोन्ही बाजुस **नो पार्किंग** क्षेत्र करण्यात येत आहे.

सदर वाहतूक अधिसूचना **दिनांक १४/०१/२०२६** रोजी ते **दिनांक १६/०१/२०२६** रोजी **सकाळी ०६:०० वा.** ते रात्रौ **२१:०० वा. पावेतो** अमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनाना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/— सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ — १ व ५/वि.शा. ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :—

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, ठाणे.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

प्रत :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/— सदरची अधिसुचना नागरिकाच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :— संबधित सपोआ, वाहतूक विभाग, ठाणे शहर व संबधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.

२/— म.न.पा.ठाणे च्या संबधीत अधिकाऱ्याकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावी